(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar

K.A.A.N.M. Sonawane Arts Comm. & Sci. College SATANA 423301 NASHIK

Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

## August -2021

ISSUE No- (CCCX) 310

## WOMEN'S EMPOWERMENT : ISSUES & CHALLENGES







Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor
Dr. Nilima D. Deshmukh
Principal
Sahakar Maharshi
Late Bhaskarrao Shingne
Arts College, Khamgaon, Dist. Buldana

Editor
Dr. Archana S. Dahane
Officiating Principal
Yeshwant Mahavidyalaya, Seloo

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

Impact Factor – 7.675

ISSN – 2278-9308

# B.Aadhar

## Peer-peer-Reviewed& Refereed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

## August -2021

ISSUE No- (CCCX) 310

## WOMEN'S EMPOWERMENT : ISSUES & CHALLENGES

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

**Dr. Nilima D. Deshmukh**
Editor
**Principal**
Sahakar Maharshi Late Bhaskarrao Shingne
Arts College, Khamgaon, Dist. Buldana

**Dr. Archana S. Dahane**
Editor
Officiating Principal
Yeshwant Mahavidyalaya, Seloo

## Aadhar International Publication

For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 310 (CCCX)
ISSN : 2278-9308
August, 2021

# INDEX-310


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Empowerment of Women: Issues & Challenges | Dr. Seema P. Salgaonkar | 1 |
| 2 | साहित्य आणि महिला सक्षमीकरण | प्रा. नरहरी सयाजी राऊत | 7 |
| 3 | मानवी हक्क आणि महिला सक्षमीकरण | जयेश रामदास ब्राम्हणे | 11 |
| 4 | महिलांचे आर्थिक, सामाजिक व राजकीय सक्षमीकरण आणि भारत | प्रा. मुनेश्वर ता. जमईवार | 16 |
| 5 | भारतातील स्त्रियांच्या स्थिती आणि कायदे | आदेश कुमार राऊत | 19 |
| 6 | भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत डॉ. सुशीला नायर यांचे योगदान | डॉ. पुरूषोत्तम सं.माहोरे | 24 |
| 7 | आजच्या काळातील नौकरी करणाऱ्या महीलां समोरील मुलांचा आहार व आरोग्य एक आव्हान. | प्रा.कविता आर.किर्दक | 29 |
| 8 | राजकीय क्षेत्र आणि महिला सबलीकरण : संधी आणि आव्हाने | प्रा. डॉ. साधना देशमुख | 31 |
| 9 | महिला सक्षमीकरण आणि कायदा | प्रा.शहाणे रंजना प्रल्हादराव | 33 |
| 10 | महिला, सक्षमीकरणात स्त्रीवादी साहित्याची भूमिका एक अभ्यास | प्रा. अलका कोकाटे (काळणे) | 37 |
| 11 | भारतातील स्त्रीमुक्ती चळवळ आणि वृत्तपत्रांची भूमिका | प्रा.डॉ.एल.पु. मेश्राम /प्रा.श्रीमती स्मिता भामरे | 41 |
| 12 | स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिला नेतृत्व | प्रा.रुपाली वंसतराव देशमुख | 44 |
| 13 | महिला सबलीकरण आणि भारतीय संविधान एक समाजशास्त्रीय अध्ययन | डॉ. सुजाता रामदासजी नाईक | 47 |
| 14 | स्त्रीयांवरील सामाजिक निर्बंध आणि परिवर्तन | प्रा.डॉ.दयानंद उत्तमराव राऊत | 52 |
| 15 | सविनय कायदेभंग चळवळीत महिलांचे योगदान | प्रा. लुलेश्वर धरमसारे | 56 |
| 16 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या काव्यातील स्त्रीविचार | स्वप्नील राजेश इंगोले | 59 |
| 17 | महिला सक्षमीकरण व महिलांचा राजकिय सहभाग | प्रा. गोपालकृष्ण श्री. राखोंडे | 64 |
| 18 | महिला सबलीकरण आणि स्त्री पुरुष समानता | सहा प्राध्या. पवन महंत | 68 |
| 19 | महिला पुढील आव्हाने आणि महिला सशक्तीकरणाची आवश्यकता | डॉ. अमित आर पांडे | 74 |
| 20 | महिला सबलीकरण आजची गरज | डॉ. विठ्ठल ल. मंदुलवार | 78 |
| 21 | महिला सबलीकरणात एनजीओची भूमिका आणि महिला सक्षमीकरण | आरती एम. देशमुख | 83 |

| | | |
|---|---|---|
| 22 | ७३ व ७४ वी घटना दुरुस्ती आणि महिला सबलीकरण<br>प्रा.डॉ. दिनकर संतुकराव कळंबे /पंढरीनाथ रामाजी गाढे | 89 |
| 23 | शारीरिक शिक्षण व महिलांचे सशक्तिकरण<br>प्रा. गणेश श्री. विश्वकर्मा | 92 |
| 24 | विजया वाड यांच्या 'ऋणानुबंध' कथासंग्रहातील स्त्रीवादी कथा<br>प्रा. डॉ. सौ. मंगल एकनाथ डोंगरे | 95 |
| 25 | राजकीय सहभागातून महिला सबलीकरण प्रा. डॉ. लक्ष्मण फुलचंद शिराळे | 102 |
| 26 | महिला सबलीकरण : आर्थिक, सामाजिक, राजकीय दृष्टीने मुल्यमापन<br>प्रा. डॉ. पी. डी. हुडेकर | 105 |
| 27 | मानवाधिकार व कायद्यांच्या माध्यमातून स्त्री सबलीकरण आणि आजची स्थिती प्रा.डॉ.नंदकिशोर अरूळकर | 109 |
| 28 | राष्ट्रविकासात महिला सक्षमीकरणाची भूमिका डॉ.राजेश्री अप्पाराव जाधव | 114 |
| 29 | मानवाधिकार आणि महिला सक्षमीकरण डॉ. विनोद मारोतराव मुडे | 118 |
| 30 | महिला सक्षमीकरण व मानवाधिकार --एक दृष्टी डॉ.एन.डी.बालपांडे | 124 |
| 31 | महिला सबलीकरण : आव्हाने आणि उपाय प्रा. डॉ. भुरके नागोराव संभाजी | 129 |
| 32 | स्त्रीयांवरील अत्याचार एक समस्या डॉ. सुनिलदत्त एस. गवरे | 133 |
| 33 | ग्रामीण आणि शहरी विभागातील किशोरवयीन मुलींच्या पोषणाचा तुलनात्मक अभ्यास. कु. मालती पांडुरंग सातव | 138 |
| 34 | भारतातील स्त्रियांचा बदलता दर्जा: एक अध्ययन डॉ.गजानन संतोषराव कुबडे | 142 |
| 35 | भारतीय संविधान आणि महिला सक्षमिकरण प्रा.डॉ.भिमराव प्रल्हाद उदाळे | 145 |
| 36 | मानवी हक्क आणि महिला सबलीकरण डॉ सौ. वंदना विनायक नढे | 149 |
| 37 | भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील विदेशी स्त्रियांचे योगदान प्रा.श्री. अमोल अरूण कुंभार | 153 |
| 38 | स्त्रियांचे पोषण आणि आरोग्य समस्या Rupali Amit Tapre(Bargal) | 158 |
| 39 | मानव अधिकार आणि महिला सबलीकरण<br>प्रा. डॉ वैशाली शांताराम बागुल | 164 |
| 40 | वृध्द स्त्रियांच्या पोषणविषयक समस्या एक अध्ययन<br>प्रा.वनिता किसनराव बोदडे | 170 |
| 41 | The Empowerment of Indian Women by Dr. B.R. Ambedkar<br>Dr. Sanjay G. Kulkarni | 174 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-9308
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO. 310 (CCCX) | August, 2021

# मानव अधिकार आणि महिला सबलीकरण

प्रा. डॉ. वैशाली शांताराम बागुल
राज्यशास्त्र विभाग
कर्मवीर आबासाहेब तथा ना.म.सोनावणे, कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
सटाणा. जिल्हा नाशिक.,फोन नंबर :—९४२३८१४३९१

प्रस्तावना :—

मानवी समाज स्त्री आणि पुरुष अशा दोन विभागात विभागलेला आहे. प्राचीन काळापासून विचार केला तर स्त्री आणि पुरुष या दोघांमध्ये भेद मानला जातो. पुरुषांसाठी सर्व कार्यक्षेत्रे खुले तर स्त्रिया मात्र चौकटीत बंदिस्थ अशी परिस्थिती सर्व जगभर होती. १९ व्या शतकापर्यंत हा अन्याय अत्याचार, स्त्रिया निमुटपणे सहन करीत होत्या. परंतु २० व्या शतकात मात्र स्त्रियांना आपल्या हक्कांची जाणीव होऊ लागली. आपल्याला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार असावा असे वाटायला लागले. यातूनच स्त्रियांनी आपल्या हक्कासाठी लढायला सुरुवात केली. परंपरागत रूढी, रीतीरिवाज यात अडकून राहिलेल्या स्त्रीचे स्थान, प्रतिष्ठा, दर्जा यात मूलगामी स्वरूपाचे बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने या विचाराचा उदय झाला. हा बदल भारतातही दिसून आला. स्त्रियांचा हा लढा सुरूच होता, यात एक महत्वाची, आणि जगाला प्रभावित करणारी घटना घडली ती म्हणजे पहिले आणि दुसरे महायुद्ध. यातून बऱ्याच सावरत असतांना काही गोष्टीकडे प्रकर्षाने लक्ष देण्याची गरज आहे याची जाणीव झाली. युद्ध समाप्ती नंतर जागतिक पातळीवर आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता, राष्ट्रा-राष्ट्रातील सहकार्यपूर्ण वातावरण निर्माण व्हावे यासाठी 'युनायटेड नेशन्स ऑफ ऑर्गनायझेशन' (UNO) ची स्थापना २४ ऑक्टोबर १९४५ ला झाली. या संघटनेच्या माध्यमातून जगभरातील स्त्रियांच्या सशक्तीकरणासाठी कार्य सुरु झाले. महिला सशक्तीकरणाचा हा आढावा मानवी हक्काच्या कसा घडून आला याचा आढावा घेण्याचा प्रयत्न या संशोधन लेखात करण्यात आला आहे.

सदर संशोधन लेखाचे लिखाण तीन विभागातून करण्यात येत आहे. कारण स्त्रियांचे सबलीकरण आणि मानवी अधिकार या दोन्ही संकल्पना मोठ्या स्वरूपात आहे. त्यामुळे याचा थोडक्यात आढावा घेतांना दोन विभागातून सविस्तर मांडणी करण्यात येऊन तिसऱ्या विभागात भारतातील स्वरूप स्पष्ट करण्यात येत आहे.

**अ)स्त्रियांचे सबलीकरण** :— स्त्रियांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून १९ व्या शतकात विचारणा सुरुवात झाली. जागतिक पातळीवर स्त्रियांनी आपल्या हक्कांच्या प्राप्तीसाठी सामुहिक स्वरूपात लढा देण्यास सुरवात झाली. त्यामुळे स्त्री चळवळीचा एकत्रित उल्लेख करतांना स्त्रीवादी विचार हि संकल्पना वापरली जाते. जगभरात सर्वच ठिकाणी स्त्रियांवर अनेक निर्बंध लादण्यात आले होते. तसेच त्यांचे वेगवेगळ्या प्रकारे शोषण देखील घडून येत होते. स्त्रियांवरील अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी व स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी जगभर हि जागृती या चळवळीच्या माध्यमातून झाली. या चळवळीची पार्श्वभूमी आणि वाटचाल फार मोठी आहे. स्त्री—पुरुष समानता, स्त्रियांवरील अन्यायाचे उच्चाटन, स्त्रियाचे समान हक्क, समान शिक्षण, राजकीय—सामाजिक—आर्थिक अधिकार या सर्वच पातळीवर हा लढा सुरु होता. या चळवळीला निश्चितच मानवी अधिकारातून बळकटी मिळाल्याचे दिसून येते. 'युनायटेड नेशन्स ऑफ ऑर्गनायझेशन' या संघटनेच्या माध्यमातून सुरु झालेल्या विविध कार्यक्रमातून स्त्री सशक्तीकरणास

बळकटी मिळाली आहे. या संघटनेच्या माध्यमातून झालेला स्त्रियांच्या विचारातील बदल, प्रवास सविस्तरपणे संशोधन लेखाच्या दुसऱ्या विभागातून मांडता येतो.

आ) संयुक्त राष्ट्र संघटना ( 'युनायटेड नेशन्स ऑफ ऑर्गनायझेशन')(UNO) आणि मानवी हक्क:—

**१ संयुक्त राष्ट्र संघटना:—** संयुक्त राष्ट्र संघटना हि आंतरराष्ट्रीय शांतात आणि सुरक्षितता यासाठी २४ ऑक्टोबर १९४६ मध्ये स्थापन झालेली संघटना आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेमध्ये आंतरराष्ट्रीय शांतात आणि सुरक्षितता टिकविण्यासाठी, शांततेला निर्माण होणारा धोका टाळण्यासाठी तसेच शांततेचा भंग करणाऱ्या आक्रमक कृत्यांना पायबंध घालण्यासाठी, सर्व मानवजातीच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी, मानवी अधिकारांसाठी, सामुहिक उपाय योजना करण्यासाठी, राष्ट्रा—राष्ट्रातील संबंध मैत्रीपूर्ण बनविण्यासाठी, आर्थिक—सामाजिक—सांस्कृतिक आणि मानवतावादी स्वरूपाचे प्रश्न सोडविण्यासाठी, भेदभाव नष्ट होण्यासाठी आणि सर्वांना मानवी हक्क आणि मुलभूत स्वातंर्त्य प्राप्त व्हावे यासाठी आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य निर्माण करणे, हि समान उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विविध राष्ट्रे जे प्रयत्न करतील त्यांच्यात समन्वय साधणारे केंद्र म्हणून कार्य करण्याच्या उद्दिष्टाने स्थापन झाले. विविध समित्यांमार्फत त्याचे हे कार्य सुरु आहे. मानवी हक्क हा राष्ट्रामधील परस्पर संबंधाचा आधार बनला असून इतर गोष्टीबरोबरच आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्राची प्रतिष्ठा त्या राष्ट्रातील मानवाधिकाराच्या दर्जावरून ठरत आहे. दुसऱ्या महायुद्धात मानवाधिकाराच्याझालेल्या मोठ्या उल्लंघनामुळे स्थापनेपासूनच संयुक्त राष्ट्र संघटना मानव अधिकाराविषयी संवेदनशील होती. संयुक्त राष्ट्र संघटनेने १० डिसेंबर १९४८ रोजी मानव अधिकारांचा जाहीरनामा घोषित केला. या जाहीरनाम्यामुळे मानव अधिकारांच्या संकल्पनेला वैश्विक स्वरूप प्राप्त झाले.दुसऱ्या महायुद्धामध्ये (सन १९३९—१९४५) घडून आलेल्या जीवित आणि वित्तहानीमुळे आतंरराष्ट्रीय समुदायाला आत्मपरीक्षण करण्यास भाग पडले. महिला, बालके, अल्पसंख्यांक, युद्ध कैदी यांच्यावर युद्ध दरम्यान झालेले अत्याचार मन हेलावून टाकणारे होते. व्यक्तीला आपल्या व्यक्तिमत्वाच्या जपवणूकीसाठी, व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी काही मुलभूत अधिकार असायला हवेत आणि अशा स्वरूपाची मागणी युद्धोत्तर काळात होऊ लागली. त्याचप्रमाणे जागतिक पातळीवर काही मुलभूत अधिकारांची यादी बनविण्यात येऊन त्यांच्या अंमलबजावणी साठी सर्व राष्ट्रांनी सामुहिक प्रयत्न करावेत असा विचार पुढे आला. ती जबाबदारी संयुक्त राष्ट्र संघटनेकडे सोपविण्यात आली. संघटनेने हि जबाबदारी पूर्ण करण्यासाठी फेब्रुवारी १९४६ साली मानवी हक्क आयोगाची स्थापना केली. या आयोगाकडे चार जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या. एक म्हणजे मानवी हक्काविषयीचा आंतराष्ट्रीय जाहीरनामा तयार करणे, दोन नागरी स्वातंर्त्य, माहितीचा, महिलाविषयीच्या अधिकारांच्या मसुदा तयार करणे. तीन अल्पसंख्यांकांचे संरक्षण करणे.चार— वंश, धर्म,भाषा, लिंग या आधारावर विषमता, भेदाभेद नष्ट करणे. ह्या चार जबाबदारीतून संयुक्त राष्ट्र संघटनेच्या मानवी हक्क आयोगाने अडीच वर्ष परिश्रम घेऊन मानवी हक्कांचा विस्तुत जाहीरनामा तयार केला. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने १० डिसेंबर १९४८ रोजी हा हक्कांचा जाहीरनामा स्वीकारला. या पाठोपाठ १९६६ मध्ये नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा आणि 'आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा' या करारांवर स्वाक्षरी करणाऱ्या राष्ट्रांना आपल्या राष्ट्रीय कायद्यामध्ये तरतुदी करून त्याची अंमलबजावणी करणे बंधनकारक ठरले.

**२ युनायटेड नेशन्स वुमेन (United nations women) :—** संयुक्त राष्ट्र संघटना संयुक्त राष्ट्र संघटनेने जागतिक पातळीवर लिंग भेद विरोधात, आणि महिलांच्या प्रश्नाविषयी अधिक संवेदनशीलतेने कार्य करण्यास सुरुवात केली. स्त्रियांचे प्रश्न त्यांच्या समस्या काय आहेत?

यासाठी आंतराष्ट्रीय पातळीवर कार्य करण्यास सुरुवात झाली. महिला सक्षमीकरणाची जाणीव वैश्विक बनविण्यात संयुक्त राष्ट्र संघटनेचे महत्वपूर्ण योगदान आहे. यात आतरराष्ट्रीय दबावगट, राजकीय पक्ष यांची भूमिका देखील महत्त्वाची आहे. हा विचार जसजसा तीव्र होत गेला तसतसे अनेक राष्ट्रामधून महिला सक्षमीकरणासाठी कायदे केले गेले. संयुक्त राष्ट्र संघटनेने मानवी हक्कांचा जाहीरनामा १०डिसेंबर १९४८ रोजी प्रसिद्ध केला. यात एकुण ३० कलमे होती. यात स्त्री आणि पुरुषांसाठी समान अधिकार म्हणून मानवी अधिकारांचा समावेश करण्यात आला. या जाहीरनाम्यात अनुक्रमे पहिल्या आणि दुसऱ्या कलमांत सर्व व्यक्ती जन्मतःच स्वतंत्र आणि समान आहेत. आणि प्रत्येक व्यक्तीला वंश, रंग, धर्म, भाषा, लिंग, संपत्ती, राष्ट्र यांचा भेद न करता हे अधिकार उपभोगण्याचा अधिकार आहे, असे स्पष्ट करण्यात आले. जाहीरनाम्याच्या २३ व्या कलमात देखील काम करण्याचा आणि समान वेतनाचा अधिकार देण्यात आला आहे. त्यामुळेच मानवी अधिकाराच्या जाहिरनाम्याकडे स्त्री मुक्तीचा जाहीरनामा म्हणूनही बघितले जाते. महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने आंतराष्ट्रीय पातळीवर पडलेले हे पहिले यशस्वी पाउल मानले जाते. यानंतर संयुक्त राष्ट्र संघटनेने १९५२ चा महिलाच्या राजकीय अधिकाराबाबतचा ठराव देखील महत्वपूर्ण आहे. पुरुषांप्रमाणेच महिलांना देखील राजकीय सहभाग प्रक्रियेत सामील होता यावे, त्यांना राजकीय अधिकार प्राप्त व्हावेत अशी मागणी करणाऱ्या ठरावावर बहुसंख्य राष्ट्रांनी स्वाक्षरी करून सहमती दर्शविली. भारताने देखील मानवी अधिकारांच्या जागतिक जाहीरनाम्याच्या निर्मितीमध्ये सक्रिय भाग घेतला होता. भारताने अनेक मूलभूत आंतरराष्ट्रीय मानवाधिकार करारांवर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

३.**आंतराष्ट्रीय पातळीवरील** परिषदा आणि महिला **सक्षमीकरण** :— संयुक्त राष्ट्र संघटनेने सन १९७५ हे वर्ष आतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून घोषित करण्यात आले. या निमित्ताने होणाऱ्या परिषदाना महिलांच्या अधिकाराविषयीची' परिषद म्हणूनही ओळखली जाते. महिलांच्या अधिकाराविषयीची पहिली परिषदेचे आयोजन १९ जून ते २ जुलै १९७५ ला मेक्सिको येथे करण्यात आले. यात महिलांच्या कल्याणासाठी पंचवार्षिक योजना बनविण्यात आली. महिलांसाठी शिक्षण, रोजगाराच्या संधी, लिंग भेदभावाला विरोध, महिलांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग, समान राजकीय—सामाजिक—आर्थिक—नागरी अधिकार, महिलांच्या समस्याविषयी संशोधन करून त्या सोडविण्याच्या दृष्टीने सूचना देणे, त्यांना आवश्यक प्रशिक्षण देण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अधिपत्याखाली एक आंतराष्ट्रीय संस्था स्थापन करावी अशी घोषणा करण्यात आली. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेतर्फे १९७५ ते १९८४ हे महिला दशक म्हणून घोषित करण्यात आले. या पहिल्या परिषदेत सुचविण्यात आल्या प्रमाणे सन १९७६ मध्ये महिलांसाठी 'आंतराष्ट्रीय संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेची' स्थापना करण्यात आली. हि स्वायत्त संस्था असून तिचे मुख्यालय सेनटो डोमिन्गो मध्ये आहे. महिलांशी निगडीत प्रश्नांसंबंधी संशोधन करणे, विकासात्मक कार्यात महिलांचा सहभाग वाढवा म्हणून प्रशिक्षण देणे. इत्यादी उद्दिष्टांसाठी या संस्थेची स्थापना झाली. हि संस्था संयुक्त राष्ट्र संघटनेच्या प्रमुख ६ शाखांपैकी आर्थिक आणि सामाजिक परिषदेला जबाबदार आहे. जागतिक पातळीवर एकूण ५७ परिषदामधून महिला विषयक प्रश्न, समस्या, त्यावरील उपाय यावर आतरराष्ट्रीय पातळीवर अमलबजावणी आणि मागोवा घेतला जातो. २०२१प्रयत्न झालेल्या या सर्व परिषदामधून महिलाच्या विविध समस्यांवर उपाय योजना सुचवून यशस्वी रित्या त्या सोडविल्या आहेत. आता पर्यंत झालेल्या विविध परिषदामध्ये विविध विषयांच्या माध्यमातून महिलांचे प्रश्न सोडविण्यात आले. महिलांना कायदेशीर हक्क प्राप्त करून देणे, कार्यात गुणात्मकता आणणे, महिलांच्या अधिकारांचे संरक्षण करणे. महिलाविरुद्ध वाढता हिंसाचार, महिलांचे शोषण, महिलांच्या विरोधातील गुन्हासारख्या घटनांची गंभीर दखल घेणे. समाजात महिलांना पुढे जाण्यासाठी पोषक

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 310 (CCCX)
ISSN : 2278-9308
August, 2021

वातावरण निर्माण करणे, महिलांना समर्थ बनविणाऱ्या योजना तयार करणे. शिक्षण, आरोग्य, समता कायदा यावर लक्ष केंद्रित करणे. याचाच परिपाक म्हणून संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने विशेष अधिवेशनात 'बालिका वर्ष २०००' जाहीर केले. संयुक्त राष्ट्र संघटना महिलांसाठी कार्य करते. याची व्याप्ती अधिकच वाढली आहे. २००६ साली संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेत सादर झालेल्या अहवालानुसार हि व्याप्ती अधिकच वाढली आहे. १२५ अब्ज डॉलर खर्च करून हा कार्यक्रम राबविण्यात आला. ०४ जुलै २०१० ला याला मूर्त रूप प्राप्त झाले. प्रत्यक्षात याचे कार्य १ जानेवारी २०११ रोजी सुरु झाले आहे. याचे मुख्यालय अमेरिकेतील न्युयॉर्क येथे असून संयुक्त राष्ट्र संघटनेच्या एकूण चार संस्थांचे एकत्रीकरणातून याचे कार्य केले जाते.

• महिला संवर्धन विभाग (१९४६)
Division for the advancement of women(DAW)
• संयुक्त राष्ट्र महिला विकास कोष (१९७६)
United Nations Development fund for women. (UNIFEM)
• आतरराष्ट्रीय संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (१९७६)(INSTRAW)
International Research and Training Institute for the advancement of women
• लिंगावर आधारित विरोधी मुद्दे–सल्लगार केंद्र(१९९८)(OSAGI)
The office of the special advisor on gender issues advancement of women

UN Women या नावाने ओळखली जाणारी संस्था २०१० पासून कार्यरत आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सदस्य राष्ट्रांना माहिती पुरविणे, तांत्रिक समस्या सोडविणे, आर्थिक मदत करणे, संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सदस्य राष्ट्रांना वरील गोष्टींची अमलबजावणी करण्यास मदत करणे, हि कार्य केली जातात.

**क)भारतातील महिला सक्षमीकरण आणि मानवी अधिकार:--**

भारतामध्ये १९३६ साली स्थापन झालेली भारतीय नागरी स्वातंर्त्य संघटना (Indian civil Liberties Union) ही प्रसिद्ध मानवी हक्क संघटना पं. जवाहरलाल नेहरू यांच्या पुढाकाराने स्थापन झाली. 'शासनाला विरोध करण्याचा हक्क,' या हेतूने ही संघटना स्थापन केली गेली होती. तसेच, स्वातंर्त्यपूर्व सामाजिक रुढी, परंपरा, स्पृश–अस्पृश्यता इत्यादींसाठी झालेल्या जन आंदोलनाचा समावेशसुद्धा मानवी हक्कांच्या चळवळीमध्येच करता येतो. महात्मा गांधी, राजा राममोहन राय, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ईश्वरचंद्र विद्यासागर, धों. के. कर्वे इत्यादींनी अस्पृश्यता, सती, बालविवाह, हुंडा यांसारखे स्त्री हक्क, बालहक्क व मानवी हक्कांसाठीच विविध लढे उभारले होते.

मानवी हक्कांचा प्रसार, प्रचार आणि संरक्षण या हेतूने उपलब्ध साधनांच्या साहाय्याने जगभरात संयुक्त राष्ट्रसंघ आंतरराष्ट्रीय व प्रादेशिक संस्था कार्य करीत आहेत. यातूनच १९९१ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे पॅरिस येथे झालेल्या विविध राष्ट्र संघटनांच्या बैठकीत 'पॅरिस तत्त्व' उद्यास आली. या तत्वांच्या आधारेच मानवी हक्क समर्थक संस्थांची स्थापना होऊन त्यांची कार्यपद्धती आखली गेली त्यानुसार प्रत्येक देशात मानवी हक्कांसाठी पावल उचलली गेली.मानवी हक्कांच्या प्रभावी संरक्षणासाठी 'मानवी अधिकार संरक्षण कायदा १९९३ मध्ये संमत करण्यात आला. या कायद्यामध्ये राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, राज्य मानवाधिकार आयोग आणि मानवाधिकार न्यायालेय यांच्या स्थापनेची तरतूद करण्यात आली आहे.भारतात मानवी हक्क राबविण्याची आणि त्यांचे संरक्षण करण्याची यंत्रणा उभारली गेली.भारतामध्ये मानवाधिकारांच्या अंमलबजावणीसाठी व सरक्षणासाठी घटनात्मक आणि वैधानिक उपाय करण्यात आले आहे. तसेच, अनेक स्वयंसेवी संस्थासुद्धा मानवाधिकार संरक्षणाच्या क्षेत्रात कार्यरत आहे.

ISSN : 2278-9308
August, 2021

१. भारतातील संविधानिक तरतुदी :—

देशाची निश्चित अशी उद्दिष्टे आणि ध्येय प्रत्येक देशाच्या राज्यघटनेत प्रतिबिंबीत होतात. भारतीय राज्यघटनेतहि सर्वांना समान अधिकार दिलेले आहेत. हे अधिकार पूर्णत्वास नेण्यासाठी केंद्र– राज्य शासनाकडून अनेक महत्वपूर्ण निर्णय, ध्येय–धोरणे व योजना कार्यान्वित केलेल्या आहेत. भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या विभागात कलम १२ ते ३५ अंतर्गत मुलभुत अधिकार नागरिकांना दिले आहेत.त्यापैकी महिलांनसाठी ची तरतुद पुढील कलमातुन दिसुन येते, कि ज्याच्या सहाय्याने महिलांचे सशक्तीकरण होते.

- कलम१४– कायद्याने समानता व समान संरक्षण.
- कलम १५ (३) – राज्य शासन महिला व बालकांसाठी विशेष तरतूद.
- कलम१६ – समान संधी.
- कलम २१ –कायद्याच्या प्रक्रीयेशिवाय व्यक्तीच्या जीवित व स्वातंत्र्याच्या हक्काचा संकोच करता येणार नाही.
- कलम२३ –मानवाचा व्यापार अथवा वेठ बिगारीस प्रतिबंद.
- कलम३९ – स्त्री–पुरुष दोघांना समान वेतन.
- कलम४२–कामाच्या ठिकाणी न्याय्य व सुरक्षित आणि प्रसुती सहाय्य देण्याची सोय.

भारतीय राज्यघटनेची निर्मिती झाली तेव्हा राज्यघटनेत मुलभूत कर्तव्याचा समावेश नव्हता. १९७६ च्या ४२ व्या घटनादुरुस्तीद्वारे भारतीय राज्यघटनेतील प्रकरण चार मध्ये ५१ (अ) हे नवीन कलम समाविष्ट करून मुलभूत कर्तव्याचा समावेश करण्यात आला.यात देखील स्त्रियाच्या प्रतिष्ठेला बाधा आणणाऱ्या प्रथा सोडून देण्याचे आवाहन करण्यात आले.अनिष्ट प्रथांचे व रुढींचे निर्मुलन करावे. २००२ साली झालेल्या ८६ व्या घंटनादुरुस्ती द्वारे, ६ ते १४ वयोगटातील मुलामुलींना शिक्षण उपलब्ध करून देणे हि पालकांची जबाबदारी आहे असे मानले.

२. केंद्र– राज्य सरकार योजना :—

भारतात राबविलेल्या विविध कार्यक्रमातूनच महिलांच्या सक्षमीकरणासाठी पोषक वातावरण निर्माण करता आले. यात निश्चितच युनोद्वारे मानवी अधिकारांच्या अमलबजावणीसहि धावे लागते. हा बदल प्रत्येक देशाने स्वीकारून तो कार्यवाहीस नेला. विविध आयोगामार्फत, योजना मार्फत हे कार्य अधिक लक्षात घेता येते. यातील काही केंद्र आणि राज्याच्या योजना सांगता येतात.

नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृहे, अल्पमुदती निवासगृह, आर्थिक दृष्ट्या दुर्बल महिलांसाठी अर्थ सहाय्य, निराधार व कैदी महिलांसाठी कार्य, नैसर्गिक आपत्तीमुळे निराधार झालेल्या, अत्याचाराला बळी पडलेल्या महिला, हुंडाग्रस्त, एच.आय.व्हि. एड्स ग्रस्त इत्यादी प्रकारच्या महिलांना स्वेच्छेने प्रवेश दिला जातो. महिलांचे शिक्षण, संगोपन व प्रशिक्षण आणि पुनर्वसन करण्यासाठी केंद्र शासनाकडून स्वाधार योजने अतर्गत अनुदान दिले जाते. सदर योजना केंद्र व राज्य शासन तसेच स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून कार्यान्वित केली जाते. त्याच बरोबर नैतिक दृष्ट्या संकटात सापडलेल्या महिला, वेश्या व्यवसायातून पोलिसांनी सुटका केलेल्या, लालबत्ती विभागातील स्त्रिया व मुलींचे स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून शिक्षण, संगोपन व प्रशिक्षण आणि पुनर्वसन करण्यासाठी केंद्र शासन कडून पायलट प्रोजेक्ट हि योजना कार्यान्वित केली जाते. तसेच राज्य शासनाकडूनही व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण, स्वयंसरक्षणासाठी प्रशिक्षण योजना, महिलांसाठी समुपदेशन केंद्र, पाळणाघर योजना, स्वयंरोजगार प्रशिक्षण, किशोरवयीन मुलींना व महिलांना कायदेशीर सल्ला, लोकप्रतिनिधीन प्रशिक्षण कुपोषित व मुळे तसेच गरोदर महिला व स्तनदा मातासाठी अतिरिक्त पोषक आहार योजना, स्वयंरोजगारासाठी

ISSN : 2278-9308
August, 2021

साहित्य पुरविणे या आणि अशा अनेक योजना महिलांसाठी राबवून त्यांचे आर्थिक सबलीकरण केले जाते.

**समारोप:—**

थोडक्यात जागतिक पातळीवर, देशाच्या पातळीवर केंद्र आणि राज्य सरकारान तर्फे विविध योजना राबवून महिलांचे सक्षमीकरण केले जाते. या सर्वासाठी जागतिक पातळीवर मानवी अधिकारांबाबत केलेले कार्य व मार्गदर्शनाने निश्चितच दिशा देण्याचे कार्य केले आहे. असे असले तरी महिलांचे सक्षमीकरणासाठी समाज देश आणि महिलांनी एकत्रित प्रयत्न केले पाहिजे. हे प्रयत्न केवळ शहरी भागापर्यंत सीमित न राहता ते समाजाच्या तळागाळापर्यंत गेले पाहिजे. स्वयंविकासाबरोबरच समाजात महिलांना स्वतंत्र निर्णय घेण्याचा अधिकार असला पाहिजे. हे सर्व पोषक वातावरण आपल्या भारतात निश्चितच निर्मिती होत आहे, अजूनही कार्य बाकी असल्याने प्रसारमाध्यमे, पोलीस, न्याय यंत्रणा समाज, स्वयंसेवी संघटना यांची भूमिका महत्वाची राहील.

**संदर्भ सूची :**


- दासगुप्ता देसाई, गोखले (२००२), महिलांचे सबलीकरण, दारिद्र्य निर्मुलन व स्वयं सहाय्य गट, यशवंत चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
- टिपणीस आर.आर., जोशी विजय नारायण (२०१४) कायदे स्त्रियांचे व मुलांचे, मुकुंद प्रकाशन ठाणे. जानेवारी २०१४.
- श्री सबनीस (२०१३) बालकांचे कायदे मुकुंद प्रकाशन, ठाणे.
- महिला व बालविकासाच्या विविध योजना, महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास आयुक्तालय पुणे.
- शासकीय ठराव महाराष्ट्र शासन शुधीपत्रक क्र. Z.P.A.,२०१०/अनिसंक.३३/प्र.क्र.१६८ परा. दिनांक २२ जुलै २०११.
- मांजरे आर.एम. (२००५) महिला सबलीकरणाच्या दिशा, योजना मासिक.
- पाटील मीरा (२००४) स्त्रिया आणि विकासाचा धोरणात्मक दृष्टीकोन. योजना मासिक
- कमला भसीन (२०१५) भारताच्या संदर्भात महिला सक्षमीकरण. योजना मासिक.
- सुरेखा तवांदकर (२०१५) महिलांचे हक्क आणि सक्षमीकरणाच्या योजना व उपाय. योजना मासिक.